**निशाणी क्रमांक ०७/ड (१)** संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक **४५२/२०१७**
शासन विरुद्ध मनोज चंद्रकांत भालेकर

## <u>अर्ज निशाणी क्रमांक ०७ वर आदेश</u>

(पारीत केल्याचा दिनांक **०४ ऑक्टोबर, २०१७**)

**०१.** पोलीस ठाणे, रोहा यांनी प्रस्तुत अर्ज पोलीस ठाणे, रोहा दारुबंदी वारस गुन्हा नोंद क्रमांक **१३३/२०१७** मधील जप्त मुद्देमाल (०१) जी. एम्. संत्र असे मराठीत नाव असलेल्या प्रत्येकी १८० मि. ली. च्या ३८ देशी दारुच्या प्लॅस्टीक बाटल्या प्रत्येकी रक्कम रुपये ५२/- एकूण अंदाजे किंमत रक्कम रुपये १,९७६/- व (०२) मॅकडॉल व्हिस्की नंबर १ असे इंग्रजीत नाव असलेल्या प्रत्येकी १८० मि. ली.च्या ०५ काचेच्या बाटल्या प्रत्येकी रक्कम रुपये १६०/- एकूण अंदाजे किंमत रक्कम रुपये ८००/- बाबत पोलीस ठाण्यात मुद्देमाल साठवणूकीसाठी जागा अपुरी असल्यामुळे पुढील आदेश होण्यासाठी दाखल केला आहे. आरोपीने योग्य ते आदेश व्हावेत असे म्हणणे दाखल केले.

**०२.** अभियोजन पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस्. पी. आंधळे व आरोपीतर्फे विधीज्ञ सौ. जे. एस्. कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** अभियोजन पक्षाने आरोपीविरुद्ध दिनांक **१७.०८.२०१७** रोजी ***<u>महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई)</u>*** अन्वये अंतीम अहवाल दाखल केला आहे. अभियोजन पक्षाने अद्याप रासायनीक परिक्षण अहवाल दाखल केलेला नाही.

**०४.** अंतीम अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसते की, अन्वेषण अधिका-याने अन्वेषणाकामी आरोपीच्या ताब्यातून उपरोक्त दारुचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**०५.** आरोपीविरुद्ध खटला प्रलंबीत आहे. पोलीस ठाण्यामध्ये मुद्देमाल ठेवण्यास जागा अपुरी असल्याच्या कारणामुळे *फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ व ४५७, फौजदारी नियमावली प्रकरण क्रमांक ०६ परिच्छेद क्रमांक ८० सोबत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४३* अन्वये बहाल झालेल्या शक्तीनुसार राज्य शासनाने तयार केलेल्या नियमानुसार म्हणजेच *मुंबई दारूबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढून घेतलेल्या वस्तु (विल्हेवाट) नियमन, १९५३* नुसार जप्त मुद्देमालाबाबत आदेश पारीत करणे गरजेचे आहे. म्हणून मला खालील प्रमाणे आदेश पारीत करणे न्यायाचे वाटते.

## आ दे श

**०१.** प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे, रोहा यांनी दाखल केलेला अर्ज **नि.क्र.०७** मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे, रोहा यांना पोलीस ठाणे, रोहा दारुबंदी वारस गुन्हा नोंद क्रमांक **१३३/२०१७** मधील जप्त दारुच्या मुद्देमालाबाबत *फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ व ४५७ सह फौजदारी नियमावली प्रकरण क्रमांक ०६ परिच्छेद क्रमांक ८० नुसार आदेशीत करण्यात येते की, त्यांनी* ***मुंबई दारूबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढून घेतलेल्या वस्तु (विल्हेवाट) नियमन, १९५३*** मधील तरतुदींचे अवलोकन व पालन करुन त्यामधील ***नियम क्रमांक ०२*** नुसार जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, रायगड यांच्याकडून सत्वर आदेश प्राप्त करुन घेवून जप्त मुद्देमालाची कायदेशीर विल्हेवाट लावावी.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम् एच् आर जी ०००९-२१२५)**
**ठिकाण : रोहा.** **प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.**
**दिनांक : ०४.१०.२०१७.** **जिल्हा रायगड.**